प्रेसनोट दिनांक – ०३/०९/२०१८

---

**वाहनचोरी करणारे सराईत जेरबंद, तीन वाहने हस्तगत दोन लाखाचा ऐवज जप्त**

---

मा. रविंद्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे यांनी पुणे शहरामध्ये वाहन चोरी व इतर गुन्हे घडु नये व गुन्हयांना प्रतिबंध व्हावा या अनुषंगाने ठोस उपाययोजना व कारवाई करण्याबाबत पोलीस स्टेशन अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी आदेश व सुचना दिलेल्या आहेत.

दि-३१/०८/२०१८ रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे, यांचे मार्गदर्शना खाली पुणे शहरामध्ये वाढते वाहन चोरीचे गुन्हयाचे अनुषंगाने सहा.पोलीस निरीक्षक श्री पवार, पोलीस हवालदार जी.बी.क्षीरसागर, पोलीस शिपाई कांबळे,पोलीस शिपाई बारवकर, खडक पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हे व गुन्हेगारानां प्रतीबंध्द करण्या करीता पेट्रोलींग फिरत छत्रपती शिवीजी रोडवर या ठिकाणी आले असता असताना तिन इसम पार्किग केले गाडयाजवळ संशयीत रित्या उभे असलेले तसेच त्यातील एक इसम गाडयांचे हॅन्डल हलवून चेक करताना दिसले म्हणून त्यांचा संशय आल्याने त्यांना जागीच ताब्यात घेवून त्यांना नाव,पत्ता विचारला असता त्यांनी यांची नावे १) **राज केशव धुमाळ वय-२४ वर्ष रा.कांचननगर निळाएकदरारोड,कोढवा पुणे २) सोमनाथ युवराज सोनवणे वय-२१ वर्ष रा.तलवणीनगर,मुरूम विटभटटी जवळ ता.बारामती जि.पुणे ३) शुभम मधुकर कदम वय-२० वर्ष रा.सर्वे नं.१९ लेन नं.२ डिलाईट बेकरी समोर गोकुळनगर कात्रज पुणे** अशी असल्याची सांगून त्यांचेजवळ सदर ठिकाणी येण्याचे व हजर राहण्याणे बाबत चौकशी केली असता त्यांनी असमाधान कारक उत्तरे दिली त्यामुळे त्यांनी वाहन चोरी केलाचा दाट संशय आल्याने त्यांना ताब्यात घेवुन पोलीसांनी त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे बारकाईन सखोल तपास केला असता त्यांचेकडुन **१)१,००,००० (एक लाख) रू.कि.यामहा कंपनीची आर.झेड.आर.** २) **५०.००० (पन्नास हजार) रू.कि.बजाज कंपनीची पलसर ३) ५०.००० (पन्नास हजार) रू.कि. टि.व्हि.एस.कंपनीची ज्युपिटर दुचाकी जप्त करण्यात आलेल्या आहेत सदर वाहनांबाबत चौकशी करता** सदर बाबत **अ.क्र.१)वडगांव निबाळकर पो.स्टे.गु.र.नं.३३४/२०१८ भा.द.वि.क ३७९ २) वडगांव निबाळकर पो.स्टे.गु.र.नं.३५१/२०१८ भा.द. वि.क.३७९, ३)भारती विद्यापीठ पो.स्टे.गु.र.नं.४३३/२०१८ भा.द.वि.क ३७९** अन्वये गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपींस हजर केले असता त्यास दिनांक – ०४/०९/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. सुहास बावचे शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी,पोलीस निरीक्षक(गुन्हे) विजयकुमार शिंदे,तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक वैभव पवार व तपास पथकातील कर्मचारी पोलीस हवालदार जी.बी.क्षीरसागर,हवालदार जाधव, पोलीस शिपाई महेश कांबळे,पोलीस शिपाई बारवकर,पोलीस शिपाई आशीष चव्हाण,पोलीस शिपाई राकेश क्षीरसागर,पोलीस शिपाई प्रमोद नेवसे ,पोलीस शिपाई संदीप कांबळे यांनी केलेली आहे.